# वास्तुपुरुषाची कथा

सध्या वास्तुशास्त्राचा बोलबाला अधिकच आहे. वास्तुशास्त्रानुसार घराची रचना करण्याकडे, वास्तुशास्त्रानुसार असणारा फ्लॅट, प्लॉट घेण्याकडे लोकांचा कल दिसून येतो. याकरिता कोणत्याही वास्तुतज्ज्ञाचा बिनबुडाचा सल्ला घेण्यास मग मागे-पुढे पाहिले जात नाही.

दुसऱ्या बाजूला वास्तुशास्त्राबद्दलची अनास्था, या शास्त्राबद्दलचे गैरसमज काही कमी नाहीत. वास्तुशास्त्र हे मुळात शास्त्र आहे का, इथपासून प्रश्नांना सुरुवात. शास्त्र असल्यास हे कालबाह्य शास्त्र आहे. त्याचा वर्तमानात काही उपयोग नाही. मग या शास्त्राला अवलंबण्याचा अट्टहास का ? असे प्रश्न विचारणारा वर्गही मोठ्या प्रमाणावर उपस्थित आहे.

प्राचीन वास्तुशास्त्रातील कित्येक तपशील, वर्णने सध्याच्या काळात अनुसरणे, आचरणे अशक्य आहे. काळाच्या ओघात शास्त्रातही काही बदल आवश्यक आहेतच. अर्थातच म्हणून शास्त्राच्या सत्यतेविषयी प्रश्न उपस्थित करणे सर्वथा चुकीचेच आहे. कारण आजही वास्तुशास्त्रातील मूलभूत सिद्धान्त महत्त्वाचे आहेत. वास्तुशास्त्राच्या मुळाशी 'निसर्ग' आहे. निसर्गनियम आहेत, जे त्रिकालाबाधित आहेत. वास्तुशास्त्राच्या मुळाशी प्राचीन भारतीय तत्त्वज्ञान आहे, जे हे अखिल विश्व स्वयंभू, सर्वव्यापी अशा 'चैतन्याने' ज्यास वेदान्ती आत्मतत्त्व, ब्रह्म मानतात त्याने व्यापिलेले आहे असे मानते.

सारे अस्तित्वच मुळी एकमेव आत्मतत्त्व ब्रह्म आहे आणि विश्वाचे प्रत्येक घटक वरकरणी जरी स्वतंत्र वाटत असले तरी ते एकमेकापासून भिन्न नाहीत. अवकाशही या चैतन्याने, ऊर्जेने भरलेले आहे. या ऊर्जामयी, चैतन्यमयी आकाशाच्या एखाद्या छोट्याशा भागास मर्यादित करून घर बांधले जाते. आकाशात ज्याप्रमाणे ग्रह, तारे आहेत; प्रकाश, डोंगर, दऱ्याखोरे, झाडे इत्यादी आहेत व त्यांच्या नियमबद्ध लयीने, तालाने ऊर्जेचे संतुलन तसेच निसर्गाचा समतोल राखला जातो तसाच समतोल घरातही अपेक्षित आहे. वास्तुशास्त्रानुसार घराची रचना करावयची म्हणजेच वास्तूची निर्मिती करताना निसर्गाशी, आसमंताशी मानवाने सुसंवाद साधावा.

वास्तूचा आकार, आकारमान, रचना, जमीन-छत, दारे-खिडकी यांबरोबर अंगण, वृक्षवल्ली, विहिरी तसेच जवळच्या प्रदेशातील झरे, नदी, पर्वत या सर्व घटकांद्वारे निसर्गाचा समतोल कृत्रिम निर्मितीद्वारे ढळता कामा नये.

सध्याच्या काळातील अनेक नैसर्गिक आपत्ती या मानवाने स्वतःच्या भोगासाठी, अहंकार जपण्यासाठी निसर्गावर विजय मिळवण्याच्या प्रयत्नात निसर्गाच्या केलेल्या अनिर्बंध उपयोगाचे फलित आहे. तसेच वास्तूतही नियमांची पायमल्ली झाल्यास ऊर्जेचा समतोल ढळून त्याचे दुष्परिणाम घरातील व्यक्तींना भोगावे लागतात.

वास्तुशास्त्राचा आवाका फार मोठा आहे. जेथे जेथे सृजनत्व निर्मितीचा संबंध येतो, तेथे तेथे वास्तुशास्त्राचा संबंध अपरिहार्यपणे येतोच. यात घरे, राजवाडे, किल्ले यांचाच केवळ नव्हे तर पाण्यातून, जमिनीवरून चालणाऱ्या वाहनांपर्यंत शास्त्राचा विस्तार आहे. हे सर्व निर्मिण्यास आवश्यक खाणकाम, धातुशास्त्र इत्यादी सर्व तंत्रज्ञानाचा वास्तुशास्त्राशी संबंध आहे. हजारो वर्षांपासून भारतीयांना या सर्व शास्त्रांचे ज्ञान होते हे अनेक अजरामर वास्तूंवरून सिद्ध होते. मत्स्यपुराणात तर प्राचीन १८ भारतीय वास्तुतज्ज्ञांची नावे सांगितली आहेत तसेच अनेक प्राचीन ग्रंथांमध्ये स्थापत्यशास्त्र, शिल्पशास्त्र, वास्तुशास्त्र या विविध नावांनी या शास्त्राचा उल्लेख आहे.

वेदकाळापासून किंवा वेदांच्याही पूर्वीपासून वास्तुकला अस्तित्वात असावी. कारण वेदांमध्ये स्थापत्याचा उल्लेख आढळतो. कश्यप ऋषींनी आयुर्वेद आणि धनुर्वेदातून शिल्पाची माहिती गोळा करून 'शिल्पसंहिता' निर्माण केली. हीच 'कश्यपसंहिता'. या संहितेचे तीन भाग होतात.

**शिल्पसंहिता**

**धातुखंड** **साधनखंड** **वास्तुखंड**

धातुखंड म्हणजे सृष्टीत असणाऱ्या वस्तूंची निर्मिती कोठे व कशी झाली ते सांगणारे शास्त्र.

साधनखंड म्हणजे सृष्टिनिर्मित वस्तू आपल्या गरजेनुसार कशा प्रकारे घ्याव्यात हे सांगणारे शास्त्र.

वास्तुखंड म्हणजे उपयोगात आणायला लागणाऱ्या वस्तूंना योग्य तो आकार, रूप देऊन त्याचा उपयोग करण्याविषयी ज्ञान देणारे शास्त्र.

स्थापत्यशास्त्रात या तीनही खंडांचा क्रमाने वापर करून वास्तू उभारता येते. म्हणूनच या शास्त्रात केवळ निवासस्थानच नव्हे

तर मंदिरे, राजवाडे, किल्ले, क्रीडास्थाने, नगररचना, रस्ते, विहिरी इत्यादी बांधकामांचा समावेश होतो.

म्हणजेच बांधकामाकरिता लागणारे दगड, माती, लोखंडादी वस्तू कोठे व कशा प्रकारे प्राप्त होतील हे सांगणारे धातुखंड धातुखंडातील सामग्रीपासून विटा, गज इत्यादी वस्तू बनवण्याबाबत ज्ञान देणारे शास्त्र ते साधनखंड व या साऱ्यांचा वास्तूकरिता कसा वापर करावा; अपेक्षित रचना, आकाराप्रमाणे वास्तू कशी उभारावी हे सांगणारे शास्त्र ते वास्तुखंड. म्हणूनच या शास्त्रात मानवी जीवनाकरिता उपयुक्त धातू, लोखंड, दगडमाती, लाकडे, चामडे या सर्व वस्तूंचा तसेच शेतीची अवजारे, शस्त्रास्त्रे, वाहने, यंत्रादी सामग्री यांचा उल्लेख आहे. प्राचीन भारतीय शिल्पशास्त्रात कृषी, जल, खनिज, यंत्र, नौका, रथ, विमान, वास्तू, प्रकार, नगररचना अशा १० शास्त्रांचा समावेश असून याविषयीची समृद्ध ग्रंथसंपदा आजही उपलब्ध आहे. भारतावरील अनेक आक्रमणे, नैसर्गिक आपत्तीनंतरही 'मयमतम्', 'मानसार', 'बृहत्संहिता' इत्यादी बरेच प्राचीन ग्रंथ व त्यांची भाषांतरे नाहीशी झालेली नाहीत. अलीकडच्या काळातील नाशिकचे कै. कृष्णाजी विनायक वझे यांनी प्राचीन भारतीय वास्तुशास्त्रावरील ग्रंथांचा अभ्यास करून तो विषय जनसामान्यांपर्यंत पोहचवला. कै. वझे स्वतः संस्कृतचे गाढे पंडित असल्यामुळे आणि इंजिनीयर असल्यामुळे त्यांनी केलेली भाषांतरे, अर्थविवरणे अचूक मानली जातात.

वास्तुशास्त्राच्या ग्रंथामध्ये वास्तूची, प्लॉटची आकृती रेखाटून त्या आकृतीची अनेक उभ्या-आडव्या रेखांद्वारे अनेक विभागांमध्ये विभागणी केलेली आढळते तसेच प्लॉटच्या आकृतीवर पालथ्या झोपलेल्या व्यक्तीचा आकार आढळतो.

प्लॉटच्या या विभागणीयुक्त आकृतीस 'एकाशितीपद वास्तुरचना' तर पालथ्या पडलेल्या व्यक्तिचित्रास 'वास्तुपुरुष' म्हणतात.

प्लॉटवरील बांधकाम कार्यास, घरच्या मांडणीस, कार्यास पूरक अशी ही पदरचना आहे. प्लॉटवरील शुभाशुभ ऊर्जाप्रवाहांनुसार विविध पदांचे, रेखांचे, रेखांच्या छेदनबिंदूचे संदर्भ वास्तू बांधताना उपयोगी पडतात. विशेष म्हणजे या पदांना नावे दिल्यामुळे पदांच्या नामनिर्देशावरून वास्तूतील विविध रचनाविशेषांना निर्देशित करता येते. जसे, घराचा मुख्य दरवाजा कोणत्या पादात असावा; घरातील पैशाची तिजोरी कोणत्या पादात ठेवावी; वास्तू बांधताना पिलर्स कोठे बांधावेत व कोठे बांधणे अशुभ आहे.

या एकाशितीपद वास्तुमंडलातील पदांना विविध देव-दानवांची नावे दिलेली आहे. वास्तुमंडलामध्ये आढळणाऱ्या वास्तुपुरुषाचा व देवदानवांचा संबंध सांगणारी किंबहुना वास्तुपुरुषाच्या जन्माची कथा मत्स्यपुराणात वर्णन केलेली आहे.

प्राचीन काळी 'अंधकासुर' नावाचा महापराक्रमी क्रूर राक्षस होता. त्याच्या पीडेपासून प्रजा, देवता यांची सुटका करण्याकरिता शंकराने अक्राळविक्राळ रूप धारण करून अंधकासुराशी युद्धात शर्थीचे प्रयत्न केले. या तुंबळ युद्धात अंधकासुराचा वध झाला. युद्धातील अथक परिश्रमानंतर भगवान शंकराच्या भालप्रदेशातून ओघळलेल्या घामाच्या थेंबातील एक थेंब पृथ्वीतलावर पडला. या घर्मबिंदूतून एका अद्‌भुत, अतिक्रूर, करालमुख पुरुषाचा जन्म झाला. जन्मतः हा पुरुष भुकेने व्याकूळ झाला होता. आपल्या भुकेच्या शमनार्थ तो त्रिलोकी अर्थात पृथ्वी, आकाश, पाताळ गिळंकृत करण्यास पुढे सरसावला. प्रथम त्याने अंधकासुराचे रक्त प्राशन केले. असे करूनही त्याची भूक शमली नाही. मग त्याने शिवशंकराचा धावा केला. अतिशय घोर तपश्चर्येने त्याने शंकराला प्रसन्न करून घेतले. आपली भूक शमविण्यासाठी तो शंकराकडे वर मागू लागला. त्याच्या घोर तपाने भगवान शंकर प्रसन्न झाले. वास्तुमंडलात वास्तुपुरुषाचे ईशान्येकडील शिर त्याने ईशान्य अर्थात शिवदिशेस भगवंताच्या चरणांवर मस्तक ठेवून वर मागत असल्याचे दर्शवते. आपल्या चरणी लीन झालेल्या या व्याकूळ पुरुषाला मग भगवंतांनी तुला त्रैलोक्यभक्षणाचा वर प्राप्त होईल असे म्हणून 'तथास्तु' केले.

वराच्या प्राप्तीनंतर या पुरुषाने दिसेल त्या प्राणाला, ऋषीमुनींना खाण्यास सुरुवात केली. यामुळे त्रिभुवनातील देव-दानव भयभीत झाले व या देव-दानवांनी एकत्र येऊन चर्चा करून व आपली सर्व शक्ती एकवटून शंकराची कृपाछाया लाभलेल्या या अद्‌भुत करालपुरुषाला पालथे पाडले व त्याच्या सर्वांगावर स्वार होऊन त्यास जखडून ठेवले.

शेवटी या करालपुरुषाने ब्रह्मदेवाकडे शरणागती पत्करली. या वेळी असे ठरले की या पृथ्वीतलावरील सर्व लोक भोजनग्रहण करताना एक ग्रास वैश्वदेवाचा म्हणून या पुरुषाला अर्पण करतील. त्याचप्रमाणे नवीन वास्तू बांधल्यानंतर त्या निमित्त जे भोजन तयार होईल तेही या पुरुषास नैवेद्य म्हणून समर्पित करावे. या पुरुषाने ब्रह्मदेवाकडून असे वरदान मिळवले की जो कोणी पृथ्वीतलावर नवीन वास्तू बांधतील व माझी भूक भागविण्यासाठी वास्तुबली देणार नाही त्यांना मी अनेक प्रकारे कष्ट देईन व ते स्वतःच माझे ग्रास बनतील. यासाठी वास्तूमध्ये घडणाऱ्या प्रत्येक घटनेला मी 'तथास्तु' म्हणेन. पुराणातील या कथेतून असे दिसते की सर्व प्रमुख देवता, ऋषी, राक्षस आपल्या नवीन वास्तूत स्थानापन्न आहेत. त्यामुळे वास्तूत वास्तुशांतीद्वारे सर्वांना मानाचे स्थान द्यावे. वास्तूमध्ये अभद्र बोल, शिव्याशाप, भांडणतंटा, जाच, अन्नाचा अपमान या गोष्टी कटाक्षाने टाळाव्यात. कारण आपल्या प्रत्येक बऱ्यावाईट कृतीस

वास्तुपुरुषाचे ‘तथास्तु’ म्हणून आशीर्वाद लाभतात व वाईट गोष्टी सत्यात उतरतात.

वास्तुपुरुष मंडलांतील पूर्व-पश्चिम आणि दक्षिणोत्तर समांतर रेषांना ‘शिरा’ असे संबोधितात. तर चौकोनाच्या कर्णरेषांना ‘कोणसूत्र’ म्हणतात. कोणसूत्रास समांतर जाणारी जी रेषा अदितीपासून सुग्रीवपदापर्यंत, जयंतपासून भृंगराजपर्यंत जाते तिना ‘वंश’ नावाने संबोधतात.

वास्तुपुरुष मंडलात शिर (मूर्धन्) मुख, हृदय, नाभी आणि वाम स्तन व दक्षिण स्तन या स्थानावर ज्या ठिकाणी शिरा व वंशरेषा एकमेकांना छेदतात त्या छेदनबिंदूणा ‘षण्महान्ति मर्मस्थाने’ म्हणतात. वास्तू बांधताना या मर्मस्थानांना वाचवता आले पाहिजे. या मर्मस्थानी स्तम्भादी जड रचना आल्यास त्यामुळे ही मर्मस्थाने विद्ध होतात व घरमालकास मोठी हानी पत्करावी लागते.

वास्तूची सहाही महान मर्मस्थाने ही उत्तर-पूर्वेकडील चतुष्कोणाकृती खंडात विसावलेली आहे. फक्त ‘नाभी’ हे मर्म मध्यभागी आहे म्हणूनच उत्तर-पूर्वेचा चतुष्कोण हा अधिकाधिक हलका ठेवण्याचे सूचित केले जाते.

वास्तुपदमंडलात मध्यभागी मोकळ्या सोडलेल्या जागेस ‘ब्रह्मस्थान’ असे म्हणतात. एकाशितीपद वास्तुपुरुष मंडलात मधले ९ भाग, चतुषष्टिपद वास्तुपुरुष मंडलात मध्यभागी असलेले ४ विभाग आणि शतपद वास्तुपुरुष मंडलातील मध्यभागी सोडलेले १६ विभाग यांस ‘ब्रह्मस्थान’ असे म्हणतात. ब्रह्मस्थानाची जागा उघडी ठेवणे अपेक्षित असते. या जागेवर कोणत्याही प्रकारे बांधकाम करु नये. हा नियम मंदिराकरिता लागू पडत नाही. ब्रह्मस्थानात देऊळ मात्र बांधता येते.

घराकरिता मात्र ब्रह्मस्थान मोकळेच असावे. या स्थानी खड्डा अथवा पाणी, हौद असणे, भिंत, स्तंभ, तुळई असू नये. हे महादोष मानले जातात. वास्तुशास्त्राचा समृद्ध इतिहास निसर्गसंतुलनाचा प्रभावी संदेश देणारा आहे आणि म्हणूनच आजच्या घडीलादेखील ही प्राचीन परंपरा पुढे चालू ठेवणे गरजेचे नव्हे अपरिहार्य आहे. शुभ भवतु.

१, वैष्णव निवास, आकुर्ली क्रॉस रोड नं. ०२, कांदिवली (पूर्व), मुंबई - ४०० १०१. संपर्क : २८८५२१०८
भ्रमणध्वनी क्र. : ९८२१३१८५५२, ९९६७३८५०५९